गणपती बाप्पाच्या हार्दिक शुभेच्छा !
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
१४.०९.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आसरा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २२६ | पृष्ठे: ०४ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# 'मातृभाषा जपा, हिंदीने देशभरात काम करण्याची संधी दिली' : अमित शाह

## महाराष्ट्र वीर सावरकरांची भूमी, सावरकर त्यांच्या काळातील सर्वात विद्वान भाषाशास्त्रज्ञ देखील होते

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** –मी गुजरातचा आहे, तिथं हिंदी बोलली जात नाही; गुजराती बोलली जाते. तथापि, जेव्हा माझ्या पक्षाने माझ्यावर राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची जबाबदारी सोपवली, तेव्हा मला देशभरात काम करताना कोणतीही अडचण आली नाही, कारण मला हिंदी समजत होती आणि बोलताही येत होती. राजभाषेने मला देशभरात काम करण्याची एक मोठी संधी दिली.

महाराष्ट्र ही वीर सावरकरांची भूमी आहे. आपण सर्व सावरकरांना एक महान स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक म्हणून ओळखतो. तथापि, सावरकर हे त्यांच्या काळातील सर्वात विद्वान भाषाशास्त्रज्ञ देखील होते. त्यांनी असे अनेक शब्द तयार केले जे आपल्या भारतीय भाषांमध्ये उपलब्ध नव्हते. त्या सर्व शब्दांना मराठी राजभाषेत आणि देशातील सर्व भाषांमध्ये नैसर्गिक स्वीकृती मिळाली, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. हिंदी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात अमित शाह यांनी भाषेवरून भाष्य केले.

**आम्हाला भारतातील प्रत्येक भाषा समृद्ध करायची आहे**

अमित शाह म्हणाले की, सावरकर यांनी टिळकांच्या 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या पत्राचा स्वीकार करून मराठी भाषेला शुद्ध केले. आम्हाला भारतातील प्रत्येक भाषा समृद्ध करायची आहे. राजभाषेच्या समृद्धीसाठी आम्ही सिंधू शब्दकोश तयार केला आहे. मी याबद्दल नंतर अधिक सांगेन, पण वीर सावरकरांनी सर्व शब्दांचे पुनरावलोकन केले होते. ते म्हणाले की, आपल्या सर्वांना सावरकर आठवतात. ते एक महान स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक म्हणून ओळखले जातात, पण सावरकर हे त्यांच्या काळातील सर्वात विद्वान भाषाशास्त्रज्ञही होते. त्यांनी असे अनेक शब्द तयार केले जे आपल्या भारतीय भाषांमध्ये उपलब्ध नव्हते, आणि त्या सर्व शब्दांना राजभाषा असलेल्या मराठीत आणि देशातील इतर सर्व भाषांमध्ये सहज स्वीकृती मिळाली. त्यांनी टिळकांच्या 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या पत्राचा स्वीकार करून मराठी भाषेचे शुद्धीकरणही केले. वीर सावरकरांनी सुधारित केलेले आणि तयार केलेले सर्व शब्द स्वीकारून, राजभाषेने हिंदीमध्ये 'शब्द सिंधू' या नावाने सावरकरांचा सन्मान केला.

**मराठी भाषेचा आदर केला जातो**

अमित शाह यांनी सांगितले की, मराठी भाषेचा आदर केला जातो, आणि तो केलाच पाहिजे, आणि आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला. भारतात महाराष्ट्रापेक्षा अधिक बहुभाषिक एकही राज्य नाही. महाराष्ट्र हे सर्वाधिक बहुभाषिक राज्य आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, विनोबा भावे म्हणाले, 'जर मी हिंदीचा वापर केला नसता, तर मी भूदान आणि ग्रामदानचा क्रांतिकारक संदेश घेऊन काश्मीर, आसाम आणि केरळमधील प्रत्येक गावातील माझ्या लोकांपर्यंत पोहोचू शकलो नसतो. ती अधिकृत भाषाच होती जिने मला प्रत्येक गावाशी संवाद साधायला शिकवले. नवीन शिक्षण धोरणात, मोदींनी प्राथमिक शिक्षणात मातृभाषा शिकणे अनिवार्य केले आहे. मूल आपली मातृभाषा शिकल्याशिवाय मोठे होऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

# पुणे-बंगळुरू महामार्गावर भीषण अपघात : दोघांचा मृत्यू, १२ जखमी

## जांभूळवाडी परिसरात भरधाव ट्रकची टेम्पोला जोरदार धडक : चार वाहनांचा चेंदामेंदा, तिघांची प्रकृती गंभीर; ट्रकचालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल.

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**पुणे** – पुणे-बंगळुरू महामार्गावर जांभूळवाडी परिसरात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास ट्रकने टेम्पोला धडक दिल्यानंतर अन्य वाहनांनाही धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले. पोलिसांनी ही माहिती दिली.

साताऱ्याहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकने पुढे असलेल्या टेम्पोला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर ट्रक आणि टेम्पो दोन्ही वाहने विरुद्ध दिशेच्या मार्गिकत गेली आणि तेथून जाणाऱ्या दोन कारला धडकली. या अपघातात सर्व वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर जखमी झालेल्या डझनहून अधिक जणांना उपचारा-साठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी हृदयनाथ मोहन गायकवाड (४७) आणि आनंदीबाई रामचंद्र वडकर (५०) यांचा उपचा-रादरम्यान मृत्यू झाला. रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी ट्रकचालक प्रमोद विठ्ठल वाघ (४०) आणि ट्रकचा मालक संदीप गोरख सूर्यवंशी (४५) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघाताची माहिती मिळताच आंबेगाव पोलीस, वाहतूक पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# शिक्षक मतदारसंघाच्या रणधुमाळीत अदिती पोहरे उतरणार

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**अमरावती** – आगामी काही महिन्यात होऊ घातलेल्या अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. इच्छुक उमेदवारांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झालेली असतानाच उच्चशिक्षित अदिती ऋषिकेश पोहरे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. एका शिक्षक संघटनेसह समर्थक शिक्षकांच्या आग्रहाला मान देत त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने अमरावती विभागातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला उधाण आले आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्वाची गरज असल्याचे समर्थक शिक्षकांचे म्हणणे आहे. वेतन, सेवाशर्ती, पदोन्नती, अनुदान, शैक्षणिक धोरणे आणि विविध प्रशासकीय अडचणी यांसारखे प्रश्न सातत्याने शासनाच्या पातळीवर मांडण्याची गरज आहे. याच अपेक्षेतून अदिती पोहरे यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरावे, यासाठी शिक्षकांकडून आग्रह करण्यात आला. शिक्षकांच्या आग्रहातूनच निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न अग्रक्रमाने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत नवी चर्चा आणि नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**अध्यापन अन संशोधनाचा प्रदीर्घ अनुभव**

शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रत्यक्ष अनुभव हीदेखील महत्त्वाची बाब मानली जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला येथे त्या २०१० पासून पदव्युत्तर स्तरावर भूकंप अभियांत्रिकी विषयाच्या विशेष प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. एम.ई. स्तरावरील विविध शोधप्रबंध तसेच संशोधन प्रकल्पांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

याशिवाय देशोन्नतीमध्ये संचालक व महिलांचे व्यासपीठ मनस्वीनी'च्या संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्या कार्यरत असून, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.

**राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता**

अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघात अनेक इच्छुकांकडून निवडणुकीची तयारी सुरू असतानाच अदिती पोहरे यांच्या उमेदवारीची चर्चा पुढे आल्याने राजकीय वतुर्ळाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. उच्चशिक्षित पार्श्वभूमी, अध्यापनाचा अनुभव, शिक्षण क्षेत्राशी असलेला संबंध आणि राजकीय वारसा या चारही बाबी त्यांच्या उमेदवारीला वेगळी धार देऊ शकतात.

> **उच्चशिक्षित जमेची बाजू**
>
> अदिती ऋषिकेश पोहरे यांची शैक्षणिक पार्श्वभूमीही लक्षवेधी आहे. त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथून एम.ई. स्ट्रक्चरल डिझाईन हे पदव्युत्तर शिक्षण विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले आहे. त्यापूर्वी त्यांनी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, बडनेरा येथून बी.ई. सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी प्राप्त केली आहे. फोर्ट कॉन्व्हेंट, मुंबई आणि होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, अमरावती येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले आहे.

> **राजकीय बाळकडू अन शिक्षण क्षेत्राचा वारसा**
>
> अदिती ऋषिकेश पोहरे या माजी कृषी मंत्री हर्षवर्धन उर्फ भैय्यासाहेब देशमुख यांच्या कन्या आहेत. त्यामुळे राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचा वारसा त्यांना लाभला आहे. लहानपणापासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणाचा अनुभव मिळाल्याने विविध प्रश्नांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. याच पार्श्वभूमीवर शिक्षक मतदारसंघातील त्यांची संभाव्य उमेदवारी चर्चेचा विषय ठरली आहे.

# भारतीय दृष्टिकोनातून इतिहास मांडणे गरजेचे : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे प्रतिपादन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – देशाच्या इतिहासाचे आणि ज्ञानपरंपरेचे वसाहतवादमुक्तीकरण म्हणजे भूतकाळ पुसून टाकणे नव्हे, तर भारतीय दृष्टिकोनातून ऐतिहासिक सत्य जगासमोर प्रामाणिकपणे मांडणे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी सांगितले.

मुंबईतील एशियाटिक सोसायटी येथे हस्तलिखितांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारतीय ज्ञानपरंपरा, इतिहास, परंपरा, भाषा, हस्तलिखिते आणि अभिलेखांचे जतन करून ते देशातील तसेच जगभरातील लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, असे शहा यांनी सांगितले. दीर्घकाळ भारतीय ज्ञानाचा अर्थ लावण्याचे काम वसाहतवादी दृष्टिकोनातून झाले. त्यामुळे भारतीयांमध्ये न्यूनगंड निर्माण होण्यास हातभार लागला, असे शहा म्हणाले. एशियाटिक सोसायटीसारख्या संस्था भारतीय ज्ञानाचे जतन करून त्याचा उपयोग देश आणि जगाच्या कल्याणासाठी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आज आपण ज्ञानाला त्या चौकटीतून मुक्त करण्यासाठी आणि वसाहतवादमुक्तीकरणाच्या दिशेने पुढे जात आहोत, असेही शहा म्हणाले. ज्या राष्ट्राला आपली स्मृती, इतिहास, परंपरा, संस्कृती, भाषा आणि अभिलेखांचे संरक्षण करता येत नाही, ते राष्ट्र कितीही शक्तिशाली असले तरी दीर्घकाळ टिकू शकत नाही, असे शहा यांनी सांगितले. संस्कृती, परंपरेचे संरक्षण गरजेचे ज्या राष्ट्राने आपल्या स्मृती, इतिहास, परंपरा, संस्कृती, अभिलेख, भाषा आणि व्याकरणाचे संरक्षण केले आहे, त्या राष्ट्राला कितीही वर्षे परकीय सत्तेखाली ठेवले तरी गुलाम बनविता येत नाही. भारत हे त्याचे उदाहरण आहे, असे ते म्हणाले.






# जनता इंग्लिश स्कूलमध्ये तान्हा पोळा उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये तान्हा पोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आकर्षक पद्धतीने सजविलेले बैल आणुन पोळ्याचा आनंद घेतला. पारंपरिक वेशभूषा व विविध उपक्रमांमुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.




या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष सतीश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे, पालक प्रतिनिधी म्हणुन अरविंद खळसकर, स्नेहल सावरकर, सुभाष बोरकुटे व मोहंमद फारुख, मुख्याध्यापिका जयश्री आंडे होत्या. आजच्या कार्यक्रमाला महत्त्वपूर्ण अशी वेशभूषा साकारलेले पाटील आणि पाटलीन याची वेशभूषा राम पंकज आंडे तर पाटलीनच्या वेशभूषेत ज्ञानेश्वरी सुनील उघडे यांनी साकारलेली होती सर्व मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांनी बैल जोडीची पूजा केल तसेच मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि बैलांची पाहणी करून पाटलांच्या हस्ते तोरण तोडण्यात आले त्यानंतर दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा राखी कॉम्पिटिशन ही स्पर्धा घेण्यात आली होती. राखी बनविण्याच्या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धेत प्रथम प्रिशा आशिष डहाके, द्वितीय स्वस्तिका किशोर खराळकर, तृतीय प्रिशिता प्रवीण अकोटकर तसेच प्रोत्साहनपर बक्षीस मयंक रोशन कराळे व विराज महेश बोरकुटे यांना देऊन त्यांच्या कलागुणांचे कौतुक करण्यात आले तसेच दहीहंडी हा कार्यक्रम घेण्यात आला होता.

संचालन पल्लवी अकोटकर, प्रास्तविक ज्योती बोरकुटे तर आभार श्रद्धा आंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोशनी खंडाईतकर, निलीमा फरकाडे, ममता अकर्ते, स्वाती खेरडे, स्मिता सावरकर, वैशाली बेलसरे, मीना देशमुख, ज्योती बोरकुटे, मंजुषा शिंगरवाडे, श्रद्धा आंडे, पल्लवी अकोटकर, तेजस्विनी काळे, उत्कर्षा तरार, प्रणय काळे, स्नेहल येवले व शीतल कळंबे यांनी सहकार्य केले.

महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये

# तान्हापोळा उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – महात्मा फुले इंग्लिश पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेत तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन सागर अकर्ते, विशाल निमकर तसेच मुख्याध्यापिका अर्चना मोघे उपस्थित होत्या. वर्ग नर्सरी ते ४ थीचे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सर्व विद्यार्थ्यांनी शेतकऱ्याची वेशभूषा साकारली होती तसेच शाळेतील नर्सरीचा विद्यार्थी प्रियांश वैभव सावरकर हा पाटीलची भूमिका व आयुक्ता सावरकर हिने पाटीलीनची भूमिका साकारलेली होती. शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना मोघे तसेच प्रमुख पाहुण्यांनी नंदी बैलांचे पूजन केले.

अतिशय सुंदर छोटे चिमुकले विद्यार्थी शेतकऱ्यांच्या भूमिकेत आले होते. प्रमुख पाहुण्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय व प्रोत्साहन असे क्रमांक निरिक्षण करुन दिले. पाटीलच्या वेशभुषेत असणाऱ्या विद्यार्थ्यांने तोरण तोडले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल व प्रसाद वाटप करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मुख्याध्यापिका अर्चना मोघे, सर्व शिक्षिका, शुभांगी पांडे, मेघा मोरे, करुणा निंबुळकर, मंजुषा अकर्ते, प्रियंका कोडापे, अश्विनी रडके, पूजा मेंढे, करिष्मा पोहरकर, कर्मचारी वृंद वनिता वानखडे, माधुरी सुपले, वैभव सावरकर आणि सर्व पालक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.



बेनोडाच्या न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूलमध्ये

# विद्यार्थी आणि शिक्षकांनी केला बैलपोळा साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – बेनोडा (शहीद) येथील न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल मधील विद्यार्थी आणि शिक्षकांनी बैलपोळा साजरा केला.

शेतात वर्षभर राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा शेतकऱ्यांचा उत्साहाचा सण म्हणजे पोळा. पोळ्यानिमित्त नर्सरी टू केजी टू च्या विद्यार्थी छान पारंपारिक वेशभूषेत शेतकऱ्यांच्या वेशभूषेत



आले होते. याप्रसंगी द्यिार्थ्यांनी सुंदर अशा रीतीने बैल सजवुन आणले होते. गुरुसेवा शैक्षणिक विकास संस्था वरुडचे अध्यक्ष अमोल निंभोरकर यांनी बैलांचे पूजन करुन छोट्या मुलांना पोळीच्या स्वरुपात चॉकलेट्स आणि विविध बक्षीस विद्यार्थ्यांना देण्यात आले जेणेकरुन विद्यार्थ्यांचे उत्साह वाढेल. शाळेच्या अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना पोळ्याचे आणि शेतकऱ्यांचे महत्त्व विषद केले, अशा रीतीने कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूलचे अध्यक्ष अमोल निंभोरकर, प्रायमरीच्या एचओडी अश्विनी श्रीराव, प्री प्रायमरीच्या एचओडी मयुरी निशान, शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

श्री चिंतेश्वर दत्त मंदिरमध्ये

# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा ८०५ वा अवतार दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री चक्रधर मंडळ द्वारा संचालित श्री चिंतेश्वर दत्त मंदिर पंचकृष्ण चौक येथे आज परमेश्वर कलियुगी अवतार सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन जल्लोषात संपन्न करण्यात आला.



या दिवशी सकाळी ९.३० वाजता भव्य मोटरसायकल रॅली काढून श्री चक्रधर नगर श्रीकृष्ण मंदिर येथे श्री चक्रधराच्या जयघोषात नेण्यात आली. त्या ठिकाणी प.पू.संगीता आई विराट यांनी सर्व रॅली धारकांना नाश्ता व चहा देऊन स्वागत केले. तेथून पूजनानंतर रॅली कृषी उत्पन्न बाजार समिती वरुड येथे पोहल्यानंतर सभापती नरेंद्र पावडे यांचे समक्ष श्री चक्रधर स्वामींच्या फोटोचे व विशेशाचे पूजन करून रॅली श्री चिंतेश्वर दत्त मंदिरमध्ये पोहोचली. त्यानंतर देवाला मंगल स्नान (उटी) करण्यात आल्यानंतर महाआरती होऊन जल्लोषामध्ये दुपारी १२ वाजता सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीचा अवतार दिन ढोल ताशाच्या गजरात संपन्न केला.

मंदिराचे अध्यक्ष उज्वल डहाके यांच्याकडून सर्व भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी शेकडो सदभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# केदारेश्वर मंदीर परिसरात बैलपोळा उत्साहात



## राजु ढोरे, देवेंद्र खेरडे यांचेसह ६ बैलजोडयांना बक्षिस






(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा सण म्हणजे बैल पोळा. या सणाच्या अनुषंगाने विविध वस्तुंनी गेल्या आठवडा भरापासून सर्वत्र बाजारपेठा सजल्या होत्या. कृषि कामाकरिता अतिउपयोगी ठरणा:या बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी तथा नागरिकांनी संत्रानगरीत बैल पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने बैलांना सजवून व पूजन करुन शहरातील दोन ठिकाणी भरविण्यात आलेल्या पोळ्यात सर्व बैल जोड्या सहभागी झाल्या होत्या. दोन वर्षानंतर प्रथम एवढ्या मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात बैलपोळा साजरा करण्यात आला.

बैलजोडीच्या सजावटीकरीता वस्तु खरेदी करण्याच्या हेतूने तालुक्यातील राजुरा बाजार येथे बाजारपेठेत शेतकऱ्यांची गेल्या आठवड्यात मोठ्या प्रमाणात गर्दी होती. घुंगरु, बेस, मठाडी, चंवर, दोर, झुला, बेगड, मोरपंख, गळयातील विविध माळा तसेच बैलजोडीच्या शिंगांना लावण्यासाठी विविध रंग आदी वस्तूंनी बाजारपेठ सजल्या होत्या. ही वस्तू विकणारे दुकानदार व त्या तयार करणाऱ्या कारागिरांकरीता हा सण वर्षभराच्या कमाईचा असतो. पोळयाच्या महिनाभरापूर्वी या वस्तुंचे कारागिर निरनिराळया रंगांमध्ये वस्तू बनविण्याच्या कामाला सुरूवात करतात. बैलांच्या पाठीवर टाकण्यात येणारी कापडी चंवर, शिंगांवर बांधल्या जाणारे कुंदे, गळ्यातील माळा आदी वस्तु बनविण्याकरिता कारागिर विशेष मेहनत घेतात. बैलांच्या पाठीवर टाकण्यात येणारी आकर्षक चंवर, आकर्षक रंगाच्या कापडावर काशिदारी काच, पैच, वेगेवगळ्या डिझाईनमध्ये बनविण्यात येतात.

पोळयाच्या आदल्या दिवशी बैलांच्या खांद्यावर लोण्यात मिसळलेली हळद लावुन खाणमर्दनचा कार्यक्रम पार पडला. याकरिता बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात लोणीची विक्री झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. पोळ्यांच्या दिवशी शेतकऱ्यांकडून सालदारांना नविन कपडे तसेच पाहुणचार देण्यात आला. पुरणपोळी व चमखुऱ्याची भाजी बनवून बैलांना नैवेद्य देण्यात आले आणि पाठीवर काठीने मार मारणाऱ्या शेतकऱ्याने बैलजोडीचे पुजन करुन बैलांना नमन केले व आपल्या साथीने शेतात भरघोस पिक होण्याची मनोकामना मागीतली आणि सायंकाळच्या सुमारास गावातील शनिवार पेठ, आंबेडकर चौक व केदारेश्वर मंदीर परीसरात सर्व बैलजोड्या एका जागी उभ्या करुन पोळा भरविल्या गेला. संत्रानगरीत सुद्धा दोन ठिकाणी मोठे पोळे भरविल्या गेले होते. पोळा सुटल्यानंतर बैलजोडी घेऊन सालदार शेतकऱ्यांच्या संबंधितांकडे पोळ्याची पोळी मागण्याकरीता गेलेत. त्यावेळी महिलांनी त्या बैलजोडीचे पुजन करुन बैलजोडीला पुरणाचा नैवेद्य देऊन सालदाराला सुद्धा नगद स्वरुपात पोळी दिली तर तालुक्यातील बहुतांश आबालवृद्ध जुगार खेळण्याकरीता ठिकठीकाणी बसल्याचे दिसून आले. जुगार खेळण्यात ते इतके तल्लीन होते की, संपूर्ण रात्रंदिवस कसा निघाला हेच त्यांना कळले नाही. वरुड तालुक्यात पोळ्याच्या पर्वावर जुगार खेळण्याची ही शेकडो वर्ष जुनी परंपरा असल्याचे अनेक वृद्ध सांगतात हे विशेष.

यावर्षी पोळाच्या निमित्ताने शहरातील केदारेश्वर मंदीर येथे बैल सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या पहिल्या ६ बैलजोडीला प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात आले. या स्पर्धेप्रसंगी सहभागी होणाऱ्या बैल सजावट स्पर्धेमध्ये पंच म्हणुन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.रामदास ब्राम्हणे, उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील, तहसिलदार रामदास शेळके, ठाणेदार अशोक जाधव आदी मान्यवरांनी पंच म्हणुन काम पाहिले.

या बैल सजावट स्पर्धेप्रसंगी प्रसिध्द स्त्रि् रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, माजी तहसिलदार कमलाकर देशमुख, कृषि उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती निळकंठ आंडे, केदारेश्वर मंदीरचे सचिव चंद्रकांत चांगदे, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष अशोक देवते, कार्यक्रमाचे संयोजक युवराज आंडे, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बैलजोडीच्या उत्तम सजावटीबद्दल ६ जोड्यांना पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये ७ हजार रुपयांचे प्रथम राजु ढोरे, ५ हजार रुपयांचे व्दितीय देवेंद्र खेरडे, ३ हजार रुपयांचे तृतीय गिरीश आजनकर तर अनुक्रमे प्रत्येकी १ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षिस महेंद्र देशमुख, गोकुल राहाटे, गोपालकृष्ण गोरक्षण यांच्या बैलजोड्यांना देण्यात आले.

याप्रसंगी सहभागी झालेल्या प्रत्येक बैलजोडी मालकांना केदारेश्वर देवस्थान व युवराज आंडे यांचे तर्फे भेटवस्तु देण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन चंद्रकांत चांगदे यांनी केले.

कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता युवराज आंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

# संपादकीय

**लोकांच्या टोमण्यांकडे दुर्लक्ष करायला शिका.**

## कर्जमाफीतील दुहेरी निकष : 'हेअर कट'चा लाभ कोणासाठी?

देशात कर्जमाफीचा विषय निघाला की सर्वप्रथम शेतकऱ्यांचे आंदोलन, रस्त्यावर उतरलेले कष्टकरी, उपोषणाला बसलेले शेतकरी आणि न्यायासाठी सरकारी दारात हेलपाटे मारणारी सर्वसामान्य माणसे डोळ्यांसमोर उभी राहतात. मात्र दुसऱ्या बाजूला हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेणाऱ्या मोठ्या उद्योगपतींनी कर्जमाफीसाठी आंदोलन केल्याचे किंवा उपोषण केल्याचे क्वचितच ऐकायला मिळते. तरीही अनेक मोठ्या कंपन्यांना दिवाळखोरी प्रक्रियेत 'हेअर कट'च्या नावाखाली मोठा दिलासा मिळतो. हीच वस्तुस्थिती समाजात आर्थिक न्याय, समानता आणि धोरणातील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करते. 'हेअर कट' म्हणजे बँकांनी थकीत कर्जाचा काही भाग माफ करून उर्वरित रक्कम स्वीकारणे. दिवाळखोरी आणि दिवाळेपणा संहिता अंतर्गत अनेक कंपन्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ही व्यवस्था तयार करण्यात आली. या प्रक्रियेचा मूळ उद्देश उद्योग वाचवणे, रोजगार टिकवणे आणि अडकलेला पैसा शक्य तितका वसूल करणे हा आहे. त्यामुळे 'हेअर कट' ही संकल्पना कायदेशीर चौकटीत अस्तित्वात आहे. मात्र प्रश्न तिच्या अस्तित्वाचा नाही; तर तिच्या वापरातील असमतोलाचा आहे.

जेव्हा एखाद्या मोठ्या उद्योगसमूहाचे हजारो कोटी रुपयांचे कर्ज मोठ्या प्रमाणात कमी केले जाते, तेव्हा सामान्य नागरिकांच्या मनात एक स्वाभाविक प्रश्न निर्माण होतोङ्गज्यांच्या श्रमावर देशाची अन्नव्यवस्था उभी आहे, त्या शेतकऱ्यांसाठी अशीच उदार भूमिका का दिसून येत नाही? काही लाख रुपयांच्या कर्जासाठी शेतकऱ्याला बँकेच्या नोटिसा, जप्तीची भीती आणि प्रशासकीय अडथळे सहन करावे लागतात; तर दुसरीकडे मोठ्या कर्जदारांच्या बाबतीत आर्थिक पुनर्रचनेची भाषा वापरली जाते. या तुलनेमुळे असंतोष वाढणे स्वाभाविक आहे.

याचा अर्थ उद्योगांना दिलासा देणारी कोणतीही व्यवस्था असू नये, असा नाही. उद्योग सुरू राहिल्यास रोजगार टिकतो, उत्पादन वाढते आणि अर्थव्यवस्थेला गती मिळते. मात्र हीच संवेदनशीलता शेतकरी, लघुउद्योजक आणि छोट्या व्यावसायिकांसाठीही समान प्रमाणात दिसली पाहिजे. आर्थिक धोरणाचा मूलभूत आधार समान न्याय असायला हवा.

आज सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा पैसा हा जनतेच्या ठेवींचा पैसा आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या कर्जाची पुनर्रचना किंवा मोठ्या प्रमाणावरील 'हेअर कट' झाल्यास त्याबाबत अधिक पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कोणत्या निकषांवर निर्णय झाला, किती रक्कम वसूल झाली आणि त्यातून सार्वजनिक हित कसे साधले गेले, याची स्पष्ट माहिती लोकांसमोर आली पाहिजे. पारदर्शकता वाढली तर गैरसमजही कमी होतील आणि व्यवस्थेवरील विश्वास वाढेल. कर्जवसुलीची प्रक्रिया सर्वांसाठी समान असणे हे लोकशाही अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. मोठ्या उद्योगांसाठी पुनर्रचनेची संधी असेल, तर संकटात सापडलेल्या शेतकरी, लघुउद्योजक आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठीही अधिक प्रभावी आणि सुलभ उपाययोजना असायला हव्यात.

अन्यथा समाजात एकासाठी नियम वेगळे आणि दुसऱ्यासाठी वेगळे अशी भावना अधिक बळावेल. आर्थिक विकासाचा खरा अर्थ केवळ मोठ्या उद्योगांच्या वाढीत नसून, समाजातील प्रत्येक घटकाला न्याय्य संधी देण्यात आहे. 'हेअर कट' असो किंवा कर्जमाफी दोन्हींचे निकष पारदर्शक, जबाबदार आणि सर्वांसाठी न्याय्य असतील, तरच आर्थिक व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात आर्थिक धोरणांची खरी कसोटी ही याच समानतेच्या तत्त्वावर ठरते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय



भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

**स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला.

हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले.

या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला.

प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो.

मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

■ प्रवीण टाके
**उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर**
९७०२८५८७७७

# सरकारी फसवेगिरीच्या चक्रात महाराष्ट्र



महाराष्ट्र आज संकटात आहे आणि या संकटांची तीव्रता वाढत असताना राज्य सरकार मात्र सत्तेच्या अहंकारात मश्गूल आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पहात बसला आहे, विद्यार्थी न्याय आणि परीक्षेतील पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरले आहेत, आदिवासी आपल्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करत आहेत, मराठा आणि धनगर समाज आरक्षणाच्या प्रलंबित प्रश्नासाठी आंदोलन करत आहेत, तर बेरोजगारी, महागाई आणि कर्जबाजारीपणाने सामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक घटक आज प्रश्न विचारत रस्त्यावर उतरला आहे; पण सत्ताधाऱ्यांकडे उत्तर नाही. प्रश्न सोडवण्याऐवजी समित्या, बैठका आणि आश्वासनांचा खेळ सुरू आहे; जनतेचा आवाज ऐकण्याऐवजी आंदोलने दडपण्याचा मार्ग स्वीकारला जात आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रातील संकटे केवळ नैसर्गिक, आर्थिक किंवा सामाजिक राहिलेली नाहीत; ती सरकारच्या निष्क्रियतेने आणि संवेदनाहीन कारभाराने अधिक गंभीर बनली आहेत. दुष्काळात होरपळतोय महाराष्ट्र माझा भर पावसाळ्यात महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. मराठवाडा, विदर्भ, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश तालुक्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे. नदी-नाले कोरडे पडले आहेत. जनावरांसाठी चारा आणि माणसांसाठी पिण्याचे पाणी हा गंभीर प्रश्न बनत आहे. रब्बी हंगामाची शाश्वती नाही. शेतकऱ्याने बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी यावर केलेला खर्च वसूल होईल की नाही, याची चिंता त्याला सतावत आहे कर्जमाफीच्या घोषणांचा गाजावाजा झाला; मात्र प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला, हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### जागृत इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात

# राधाकृष्ण वेशभूषा सांस्कृतिक कार्यक्रम आणि दहीहंडी सोहळा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – जागृत इंग्लिश प्रायमरी अँड हायर प्रायमरी स्कूल येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आनंदात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभागीत कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमास व स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आडे, प्रशासकीय अधिकारी देशपांडे, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका धनश्री लाडोळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे संगीत श्लोके नृत्य व



चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राधा कृष्णाची वेशभूषा करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतली व विविध सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे श्रीकृष्ण संबंधित चित्र रंगनीय वस्तु सजविणे अशा विविध कृती घेण्यात आला.

कार्यक्रमाची प्रभावी संचालन प्रांजली बाजड व परिधी थुकेकर यांनी केले. विजय आडे, पूजा मांडवगडे, धनश्री लाडोळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे समारोप दहीहंडी फोडून करण्यात आला. दहीहंडीच्या उत्साह पूर्ण सोहळ्यांनी संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांना गोपालकाल्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ब्रिस्टल विद्यापीठाचा मुंबईत पहिला आंतरराष्ट्रीय कॅम्पस

### पहिल्या तुकडीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत, डेटा सायन्स, आर्ट्सचे अभ्यासक्रम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत परदेशी विद्यापीठांकडून भारतात कॅम्पस सुरू करण्याचे प्रमाण वाढत असताना, ब्रिस्टल विद्यापीठाने मुंबईतील आपला पहिला आंतरराष्ट्रीय कॅम्पस औपचारिकरीत्या सुरू केला आहे. विद्यापीठाने आपल्या पहिल्या विद्यार्थी तुकडीचेही स्वागत केले.

डेटा सायन्स, वित्त, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक) आणि इमर्सिव्ह आर्ट्स यांसारख्या क्षेत्रांवर अभ्यासक्रमांचा भर असेल. या ब्रिस्टल विद्यापीठाला यावर्षी जूनमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'मान्यता पत्र' मिळाले. नामांकित परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सुरू



करण्यास परवानगी देण्याच्या धोरणाचा हा भाग आहे.

ब्रिस्टल विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, हे अभ्यासक्रम ब्रिस्टलमधील विद्यापीठाच्या विद्यमान पदवी अभ्यासक्रमांवर आधारित असून, भारतीय संदर्भानुसार त्यात आवश्यक बदल करण्यात आले आहेत. मुंबईतील कॅम्पसमध्ये संशोधन, उद्योग क्षेत्राशी संवाद आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षणावरही भर दिला जाणार आहे.

### राजश्री शाहू महाराज संचालित

# नॅशनल इंग्लिश स्कूल येथे बैलपोळा उत्साहात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – राजश्री शाहू महाराज संचालित नॅशनल इंग्लिश स्कूल येथे बैलपोळा सण मोठ्या उत्साह आणि पारंपरिक थाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नर्सरी ते इयत्ता ४ थी पर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



कार्यक्रमाची विशेष आकर्षणे म्हणजे लहान मुले शेतकरी तर मुली शेतकरीण यांच्या पारंपरिक वेशभूषेत अतिशय सुंदर दिसत होती. मुलांनी सोबत सजवलेले सुंदर नंदी बैल आणले होते, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने झाली. त्यानंतर सर्व मुलांनी आपल्या सोबत आणलेल्या बैलांची सजावट आणि आपल्या वेशभूषेने उपस्थितांची मने जिंकली. शेतकरी संस्कृतीची ओळख लहान वयातच मुलांना व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. प्राचार्य विनोद भोंगाडे व शिक्षकांनी सर्व विद्यार्थी, पालक व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

एकूणच पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपणारा हा बैलपोळा उत्सव मुलांच्या आनंदात आणि उत्साहात पार पडला.

# पॉक्सो प्रकरणात आदित्य यास अटकपुर्व जामीन मंजूर

### ॲड.अनिल घाटोळे व ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या प्रभावी युक्तिवादाला यश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३५१ (२), ३५२, ६४ (२) (एम), ६५ (१) तसेच पोक्सो कायद्यामधील कलम ४ व ६ अंतर्गत दाखल प्रकरणात आरोपी आदित्य यास जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय वरुड यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. सदर प्रकरणात



आरोपीच्या वतीने ॲड.अनिल घाटोळे व ॲड.अंकिता जैस्वाल यांनी बाजु मांडत न्यायालयासमोर बचाव पक्षाचे ठोस कायदेशीर मुद्दे प्रभावीपणे मांडले. यावेळी बचाव पक्षाने प्रकरणातील आरोपांचे स्वरुप, उपलब्ध कागदपत्रे, तपासाची सद्य:स्थिती तसेच आरोपीस अटकपूर्व जामीन देण्याची आवश्यकता याबाबत न्यायालयाचे लक्ष वेधले तसेच आरोपी तपास यंत्रणेला आवश्यक ते सहकार्य करण्यास तयार असल्याचा मुद्दाही न्यायालयासमोर मांडण्यात आला.

बचाव पक्षाचे अधिवक्ता तसेच सरकारी पक्षाचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने प्रकरणातील परिस्थितीचा विचार करुन आरोपी आदित्य यास अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या निर्णयामुळे आरोपीस मोठा कायदेशीर दिलासा मिळाला असून ॲड.अनिल घाटोळे व ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या प्रभावी व यशस्वी युक्तिवादाचे हे महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे.

# जागृत इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये तान्हा पोळा उत्साह व आनंदात साजरा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – जागृत इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये तान्हा पोळा सण मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आकर्षक सजावट केलेले बैल व बैलजोड्या शाळेत आणून पारंपरिक पद्धतीने पोळा सणाचा आनंद घेतला. कार्यक्रमाची सुरुवात



संस्थेचे सचिव संतोष क्षीरसागर, कोषाध्यक्ष अरुण वानखडे, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका धनश्री लाडोळे यांच्या हस्ते बैलजोडीचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी पोशाख, फुलांच्या माळा व विविध सजावटींच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शेतकरी, बैल आणि शेती यांचे महत्त्व समजावून सांगितले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा व संस्कृतीची ओळख झाली. संपूर्ण शाळेचा परिसर आनंदाने व उत्साहाने भरुन गेला.

# नंदिग्राममधून तृणमूल काँग्रेसचा उमेदवार ठरला, माजी सीएम ममतांची बालेकिल्लयातून अखेर माघार : तब्बल १५ वर्षानंतर दीदी विधानसभेत दिसणार नाहीत!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***नवी दिल्ली*** – पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी विधानसभा पोटनिवडणूक लढवणार नाहीत. नंदिग्राम आणि रेजीनगर विधानसभा जागांवर ६ ऑक्टोबर रोजी निवडणूक लढवली जाईल. नंदिग्रामसाठी संचिता प्रधान (डे) आणि रेजीनगरसाठी रबीउल आलम चौधरी यांना उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी जागा रिक्त केल्यामुळे नंदिग्रामची पोटनिवडणूक होत आहे. आम जनता उन्नयन पार्टीचे (एजेयूपी) संस्थापक हुमायून कबीर यांच्या राजीनाम्यानंतर रेजीनगरची जागा रिक्त झाली होती. ममता बॅनर्जी २०११ मध्ये पहिल्यांदा आमदार झाल्या. पश्चिम बंगालमधील भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक जिंकून त्यांनी विधानसभेत प्रवेश केला. यापूर्वी त्या लोकसभेच्या खासदार होत्या. गेल्या १५ वर्षांत ममता बॅनर्जी विधानसभेबाहेर राहण्याची ही पहिलीच वेळ आहे.

# कौटुंबिक वादातून पत्नीला काठीने मारहाण

### पतीविरुद्ध गुन्हा : कुरळी येथील घटना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – घरगुती कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीला काठीने मारहाण करून दुखापत केल्याची घटना कुरळी येथे घडली. याप्रकरणी माया विनोद घाटवडे (३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विनोद रामचंद्र घाटवडे (३६) याच्याविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी माया घाटवडे या घरात असताना आरोपी विनोद घाटवडे याने घरगुती कारणावरून त्यांच्याशी वाद घातला. सुरुवातीला शाब्दिक वाद झाल्यानंतर वादाचे रूपांतर भांडणात झाले. त्यावेळी आरोपीने काठीचा वापर करून पत्नीला मारहाण केली.

या मारहाणीत फिर्यादीच्या कानाला दुखापत होऊन रक्तस्राव झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर फिर्यादीने पोलिस ठाण्यात धाव घेऊन पतीविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीची नोंद घेत आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(२), ३५१(३) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून मारहाणीचे नेमके कारण तसेच घटनेच्या पार्श्वभूमीचा तपास केला जात आहे.

### गणोशोत्सव आणि इतर आगामी सणांच्या पार्श्वभुमिवर

# जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या उपरिशतीत शांतता कमिटीची बैठक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – येत्या काही दिवसांमध्ये येऊ घातलेला गणोशोत्सव आणि इतर आगामी सणांच्या पार्श्वभुमिवर मोर्शी उपविभागीय शांतता समितीची बैठक आज शहरातील श्रध्दा राधा सेलिब्रेशन येथे मोठया उत्साहात पार पडली.



यावेळी व्यासपिठावर मोर्शीचे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम, मोर्शीचे उपविभागीय अधिकारी उमेश पाटील, परतवाडाच्या उपविभागीय अधिकारी वैशाली भोंगे, प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे, वरुड न.प.मुख्याधिकारी गजानन भोयर, महावितरणचे सहायक अभियंता गौरव चरडे, अंकुश शिंगरवाडे, मोर्शीचे निवासी नायब तहसिलदार विनोद वानखडे, मोर्शी न.प.कार्यालयीन अधिक्षक अमोल ढोले, सा.बांधकाम विभागाच्या वैष्णवी टेकाडे, वरुडचे ठाणेदार ठाणेदार अशोक जाधव, मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले, शें.घाटचे ठाणेदार राहुल गवई, बेनोडाचे ठाणेदार विवेक देशमुख, शिरखेडचे सावडीकर आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी सण, उत्सव शांततेत पार पडण्याकरीता प्रत्येक कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे, आपले गाव, आपला परिसत शांत राहण्यासाठी आणि सण, उत्सव अधिकधिक आनंद आणि उत्साहाने साजरे होण्याकरीता प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.

यावेळी बोलतांना जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांनी वरुड हे शांतताप्रिय शहर म्हणुन परिचित आहेत, येत्या काही दिवसांमध्ये होवु घातलेले सण, उत्सव अत्यंत शांततेत पार पडावे, याकरीता पोलिस प्रशासनाने संपुर्ण तयारी केली असून कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आपणा सर्वांची मदत आवश्यक आहे, या सण, उत्सवा दरम्यान कोणत्याही प्रकारचे कायद्याचे उल्लंघण होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घेणे गरजेचे आहे, अपघातांची संख्या मोठया प्रमाणात वाढली असतांना हेल्मेट न घातल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या मोठी आहे, अशा स्थितीत वाहन चालवितांना हेल्मेट शिवाय वाहन चालवु नका, अन्यथा आम्हाला हेल्मेट नसलेल्या वाहनचालकांवर कारवाही करावी लागेल, असा ईशाराही निकेतन कदम यांनी यावेळी दिला.

याप्रसंगी पोलिस पाटील संघटनेच्या वतीने वानखडे पाटील, पत्रकार संघटनेच्या वतीने दिपक खंडेलवाल, प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे, कानुगो, डॉ.समिर अली, जरुडचे तंटामुक्त समिती माजी अध्यक्ष सोपान ढोले यांचेसह अनेकांनी आपली मते व्यक्त केली.

याप्रसंगी मोर्शी उपविभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्षेत्रातील पोलिस पाटील, विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार, सर्वधर्मिय नागरिक, सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.किशोर तडस, प्रास्तविक उपविभागीय अधिकारी उमेश पाटील तर आभार ठाणेदार अशोक जाधव यांनी मानले.

# स्वा.बॅ.सावरकर सार्वजनिक वाचनालय काटी येथे तान्हापोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वा.बॅ.सावरकर सार्वजनिक वाचनालय काटी येथे तान्हापोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या तान्हा पोळयामध्ये गावातील एकूण ७२ मुलं नंदिबैलाच्या प्रतिकृती घेऊन सहभागी होते. प्रथम शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गावातील दादाराव टेकोडे यांचे अध्यक्षतेखाली सुंदर प्रतिकृतीचे निरीक्षण करण्यासाठी कमेटी नेमण्यात आली. या पंचकमेटीमध्ये अध्यक्ष दादाराव टेकोडे, पोलीस पाटील विद्यासागर तट्टे, तंटामुक्त समिती अध्यक्ष मुकेश शेळके, सेवा सहकारी सोसायटी अध्यक्ष संजय घाटोळे, वाचनालयाच्या कार्यकारी सदस्या ममता बोहरूपी यांची निवड करण्यात आली.





या कमेटी द्वारे पाच नंबर निवडण्यात आले. प्रथम बक्षीस ३५१ रुपये, द्वितीय ३०१ रुपये, तृतीय २५१ रुपये, चतुर्थ २०१ रुपये, पंचम १५१ रुपये बक्षीस देण्यात आले. यावेळी सहभागी प्रत्येकाला प्रोत्साहनपर बक्षिसांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता वाचनालयाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. त्याचप्रमाणे गावातील बहुसंख्य नागरिक, महिला आणि मुलांचे पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल गजानन खडसे व आभार अरुणकुमार दुगाने यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता कर्मचारी मुकेश म्हस्की आणि प्रशांत शेळके यांनी अथक परिश्रम घेतले.

न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# साक्षरतेचे महत्त्व रुजविण्यासाठी विशेष उपक्रम



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेचे महत्त्व रुजविण्यासाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत साक्षरतेची शपथ घेतली.

विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, साक्षरतेची गरज तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन असून साक्षर समाज हीच विकसित समाजाची ओळख आहे,' असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी जागरुकता, सामाजिक बांधिलकी आणि साक्षरतेचा प्रसार करण्याची भावना निर्माण झाली.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक ए.बी.चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# राज्य कार्यकारिणीपर्यंत पोहोचला 'देवळाचा धर्म व धर्माची मस्जिद'चा विवेकवादी संदेश

## लेखिका रजियाताई सुलताना यांचे पुस्तक अंनिसच्या राज्य पदाधिकाऱ्यांना भेट

## प्रबोधनकार ठाकरे व शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांना समर्पित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अंबाजोगाई** – अमरावती येथील ज्येष्ठ लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्या रजियाताई सुलताना यांच्या 'देवळाचा धर्म व धर्माची मस्जिद' या पुस्तकाने राज्य कार्यकारिणीपर्यंत विवेकवादी विचारांचा संदेश पोहोचविला आहे. अंबाजोगाई येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीच्या दोन दिवसीय बैठकीत त्यांनी हे पुस्तक राज्य पदाधिकाऱ्यांना भेट देत प्रबोधनात्मक उपक्रमाला वेगळी दिशा दिली.



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने दर चार महिन्यांनी राज्य कार्यकारिणीची बैठक आयोजित केली जाते. यावर्षीची बैठक १२ व १३ सप्टेंबर २०२६ रोजी मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई (जि. बीड) येथे पार पडत असून, राज्यभरातील शाखांच्या कामाचा आढावा, संघटनात्मक विषय आणि आगामी उपक्रमांच्या नियोजनावर सखोल चर्चा करण्यात आली. 'देवळाचा धर्म व धर्माची मस्जिद' या पुस्तकातून धर्म, समाज आणि विवेकवादी विचारांच्या संदर्भात चिकित्सक आणि प्रबोधनात्मक मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हे पुस्तक प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे आणि शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना समर्पित करण्यात आले असून, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि अविवेकी परंपरांविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा ठाम संदेश त्यातून दिला आहे.

या प्रसंगी अंनिसचे राज्याध्यक्ष माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, राज्य प्रधानसचिव विनायक सावळे, टी. आर. गोराने, रुकसाना मुल्ला, आरती नाईक, राज्य कार्यवाह अशोक निकम तसेच मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य यांना पुस्तक भेट देण्यात आले. अमरावती जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर आणि जिल्हा प्रधानसचिव विजय डवरे यांच्या हस्ते राज्य पदाधिकाऱ्यांना पुस्तकाचे वितरण करण्यात आले. यावेळी लेखन, वाचन आणि प्रबोधनाच्या माध्यमातून समाजात चिकित्सक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी मूल्ये अधिक व्यापकपणे रुजविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

'विवेकाचा आवाज बुलंद करूया!' या संदेशाने प्रेरित हा उपक्रम अंधश्रद्धामुक्त, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला आणि विचारशील समाज घडविण्याच्या चळवळीला बळ देणारा ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणपती व बैल निर्मिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणपती व बैल निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून सुंदर गणपती व बैलांच्या मूर्ती साकारल्या. कलेतून पर्यावरण संवर्धन हा संदेश देत पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना या उपक्रमातून समजले.

या कार्यशाळेचे आयोजन कमलाकर मेकलवार व सविता ठाकरे यांनी केले. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या सर्व वर्गशिक्षकांनी विशेष मेहनत घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमाला मुख्याध्यापक ए.बी.चौधरी, उपमुख्याध्यापक सुरेंद्र देशमुख, प्रमोद केणे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## चेंबूरमध्ये चालत्या बेस्ट बसला आग

# चालकाच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला, ४० प्रवासी बचावले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – चेंबूर कॉलनीतील राम मंदिर परिसरात रविवारी सकाळी धावत्या बेस्ट बसला बॅटरी बॉक्समध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना सोमवारी सकाळी घडली.



चालकाने प्रसंगावधान राखत बस थांबवून बसमधील अग्निशमन यंत्रांचा वापर करून आगीवर नियंत्रण मिळवले. चालकाच्या प्रसंगावधानाने बसमधील ४० प्रवासी थोडक्यात बचावले आणि मोठा अनर्थ टळला. देवनार एसएमटीएटीपीएलच्या आगारातील लीजवरील ए-३६४ मार्गावरील बस क्रमांक ७७५ (एमएच-०१-एफसी-५४९४) महूल गाव ते ट्रॉम्बे या मार्गावर धावत होती. बस राम मंदिराजवळ पोहोचली असता चालकाला त्याच्या आसनाखालील भागातून धूर येत असल्याचे निदर्शनास आले. त्याने तातडीने बस थांबवून पाहणी केली असता बॅटरी बॉक्समध्ये ठिणगी पडून शॉर्टसर्किट झाले आणि आग लागल्याचे निदर्शनास आले. चालकाने तत्काळ बसमधील तिन्ही अग्निशमन यंत्रांचा वापर वेट करून सुमारे सकाळी ८.१५ वाजता आग पूर्णपणे विझवली. प्रवाशांनी अग्निशमन दलाला माहिती दिल्यानंतर अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत चालकाने आग आटोक्यात आणली होती. खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी बसची बॅटरी जोडणी तोडून बॅटरी बाहेर काढली.

# जोलवाडीत तान्हा पोळा २०२६ उत्साहात : २९ चिमुकल्यांच्या सहभागाने रंगला संस्कारमय सोहळा

## डॉ.प्रमोद जाणे यांचे अध्यक्षीय मार्गदर्शन : हरिश वानखडे यांचा गुणगौरव, स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिकांसह शालेय साहित्याचे वाटप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जोलवाडी** – येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही पोळ्याच्या पाडव्याच्या निमित्ताने तान्हा पोळा २०२६ हा संस्कारमय आणि पारंपरिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गावातील चिमुकल्यांनी आकर्षक सजविलेल्या लाकडी बैलांसह मिरवणुकीत सहभाग घेत परिसरात उत्सवी वातावरण निर्माण केले. बालकांमध्ये संस्कृती, पर्यावरण आणि प्राण्यांप्रती प्रेमाची भावना रुजविणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत भानुदास महाराज संस्था, वर्धमनेरी येथील भूमिपुत्र तथा आरोग्य चिकित्सक डॉ.प्रमोद जाणे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी शास्त्रज्ञ प्रा.राजेंद्र जाणे (अमरावती) उपस्थित होते, तर माजी उपसरपंच साहेबराव जाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी सरपंच विलास रामकृष्ण जाणे, ज्येष्ठ महिला नागरिक सुमन नानासाहेब जाणे, उपसरपंच मेघराज भारसाकडे, पोलीस पाटील शुभांगी शेटे, आशा सेविका सारिका ऊईके, ज्येष्ठ नागरिक ज्ञानेश्वर जाणे व साहेबराव वानखडे तसेच ग्रामपंचायत सदस्य दुर्गा जहकर, स्वाती जाणे, नूतन जाणे आणि सोमेश्वर टेकाम यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्रा.राजेंद्र जाणे यांनी तान्हा पोळ्यातील चिमुकल्यांच्या सजावटीचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये पर्यावरण, निसर्ग, प्राणी आणि मानवी जीवनाविषयी संवेदनशीलता विकसित होते, असे सांगितले. गावागावातील मतभेद आणि पक्षभेद विसरून सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामपंचायतीने घेतलेल्या या उपक्रमाचे कौतुक करत गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ.प्रमोद जाणे यांनी, माणूस कितीही मोठा झाला तरी त्याची ओळख गावाच्या नावानेच होते. मुले इंजिनिअर, शिक्षक, डॉक्टर किंवा प्राध्यापक बनतील; पण त्याआधी चांगला माणूस होणे अधिक महत्त्वाचे आहे, असे प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

यावेळी जोलवाडीचा २०२६ चा गुणगौरव पुरस्कार हरिश रविंद्रपंत वानखडे यांना जाहीर करण्यात आला. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन जीएमसी नागपूर येथे शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या वडील रविंद्रपंत वानखडे यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

तान्हा पोळा स्पर्धेत एकूण २९ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. स्पर्धेत पाच मानांकन आणि पाच प्रोत्साहनपर अशा एकूण दहा रोख पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांकाचे २,००१ रुपयांचे पारितोषिक सरपंच विलास जाणे यांच्या तर्फे नीरव जाणे यांना देण्यात आले. द्वितीय क्रमांकाचे १,५०१ रुपये, गोरांश जाणे, तृतीय क्रमांकाचे १,००१ रुपये चिन्मय जाणे, चतुर्थ क्रमांकाचे ७०१ रुपये देवांश जाणे आणि पाचव्या क्रमांकाचे ५०१ रुपये श्रेयस संदीप जाणे यांना प्रदान करण्यात आले.

डॉ.प्रमोद जाणे यांच्या तर्फे सम्राट राजेश जाणे, मानवित नेहारे, युगांश बहुरूपी, मनस्वी साहारे आणि आरोही टेकाम या स्पर्धकांना प्रत्येकी ५०१ रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. याशिवाय सर्व स्पर्धकांना खाऊ आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघराज भारसाकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरीश शेटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नामदेव नेहारे, सुभाष नेहारे, उत्तम नेहारे, ज्ञानेश्वर मसराम, साहेब जाणे, महेंद्र तायवाडे, संदीप उमरकर, महेश मेश्राम, गुंजन जाणे, करण दूधकवरे, मंगेश नेहारे, सोहम मडावी, आदित्य दूधकवरे, निखिल अशोक जाणे, देवेंद्र दूधकवरे, राम उमरकर आणि हार्दिक शेटे यांनी विशेष परिश्रम घेतले. हा तान्हा पोळा सोहळा जोलवाडीच्या सामाजिक ऐक्य, संस्कार आणि परंपरेचे दर्शन घडविणारा ठरला.




# बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलाचा मृत्यू : नातेवाईकांचे ठिय्या आंदोलन, चौकशीची मागणी

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**कराड** – कराड येथील शासकीय कै. माधवराव जाधव मुलांच्या बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलाचा उपचारादरम्यान शनिवारी मृत्यू झाला. निशांत नितीन शिलेवंत असे मृत मुलाचे नाव आहे. सुधारगृहातील मुलांमध्ये झालेल्या मारहाणीत निशांत गंभीर जखमी झाल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला असून, संबंधित कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, २७ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास निशांतला मारहाण झाली होती. त्यानंतर त्याला कराड येथील कृष्णा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती खालावल्याने गुरुवारी (ता. १०) मध्यरात्री त्याला पुढील उपचारासाठी कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच शनिवारी त्याचा मृत्यू झाला.

मृत्यूची माहिती मिळताच संतप्त नातेवाईकांनी बालसुधारगृहासमोर ठिय्या आंदोलन केले. दोषींवर कारवाई होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली. प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. निशांतचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी शनिवारी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दोषींवर तत्काळ कठोर कारवाई करावी आणि बाल सुधारगृहातील व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी नातेवाईकांनी दिवसभर ठिय्या आंदोलन सुरू ठेवल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## नवीन विमा व्यवस्थेचा व्लादिमीर पुतीन यांचा प्रस्ताव

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

***नवी दिल्ली*** – रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी रविवारी ब्रिक्स देशांमध्ये नवीन विमा व्यवस्था आणि धान्य बाजारासाठी सहकार्यात्मक उपक्रमाचा प्रस्ताव दिला. युक्रेनवरील युद्धामुळे पाश्चात्य महासत्तांनी मॉस्कोवर लादलेल्या अत्यंत कठोर निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर, पुतीन यांनी ब्रिक्स सदस्य देश तसेच 'ग्लोबल साउथमधील' (दक्षिण गोलार्धातील विकसनशील) देशांमधील आर्थिक वाढीसाठी या नवीन उपक्रमांचा प्रस्ताव मांडला.

# जरांगे यांना पुन्हा धक्का, मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली : गणेशोत्सवानंतर इतर ठिकाणचा पर्याय सूचवला

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**मुंबई** – मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि सरकारच्या आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसण्याच्या तयारीत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. रविवारी आझाद मैदान पोलिसांनी पहिला अर्ज फेटाळल्यानंतर मनोज जरांगे यांच्यावतीने नव्याने उपोषणाची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी अत्यंत कठोर भूमिका घेत दुसऱ्यांदाही या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे.

गणेशोत्सवानंतर जरांगेंच्या उपोषणाला आझाद मैदान सोडून इतर ठिकाणी परवानगी देण्यात येईल, असं पत्रही मुंबई पोलिसांनी दिल्याची माहिती आहे. मात्र, सलग दुसऱ्यांदा परवानगी नाकारल्या मुळे आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. १९ सप्टेंबरच्या उपोषणावर टांगती तलवार

मनोज जरांगे पाटील यांनी १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर अनिश्चित काळासाठी आमरण उपोषणाची हाक दिली आहे. १५ सप्टेंबर रोजी ते अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. परंतु, पोलिसांनी लागोपाठ दोनदा परवानगी फेटाळल्याने १९ तारखेच्या या उपोषणावर आणि मुंबई मार्चवर अनिश्चिततेचे ढग जमा झाले आहेत.

पोलिसांनी परवानगी का नाकारली? गेल्या वर्षीचा अनुभव : गेल्या वर्षी आंदोलनादरम्यान दक्षिण मुंबईत सुमारे ५,००० वाहने अनधिकृतपणे उभी राहिल्याने संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली होती आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले होते.

# सर्पदंशाने २८ वर्षाच्या युवकाचा मृत्यू

## शहरातील राजुरा बाजार रेल्वे क्रासींग नजीकची घटना

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**वरुड** – शहरातील राजुरा बाजार रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंग नजीकचा रहिवाशी असलेल्या लक्ष्मण सुर्यभान भलावी नामक २८ वर्षीय युवकाचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना आज सायंकाळच्या सुमारास घडली. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप मृतकाच्या नातेवाईकांनी केला असून संबंधितांवर कारवाही करण्याची मागणी केली आहे.

प्राप्त माहीतीनुसार, लक्ष्मण भलावी नामक युवकाला दिनेश सुपले यांचे शेतात पहाटे ४ च्या सुमारास सर्पदंश झाला. सर्पदंश झाल्याचे कळताच त्यांना शहरातील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे प्राथमिक उपचारा नंतर सकाळी ९ च्या सुमारास रुग्णालयातून सुटी देण्यात आली परंतु दुपारी ३ च्या सुमारास लक्ष्मण याची प्रकृती पुन्हा बिघडली आणि त्याला पुन्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, अखेर सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली. लक्ष्मण सर्पदंशातुन पुर्णपणे बरा झाला नसतांना सुध्दा त्याला रुग्णालयातून सुटी कशी काय देण्यात आली? पुढील उपचारासाठी त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात का पाठविण्यात आले नाही? यासह विविध प्रश्न उपस्थित करीत नातेवाईकांनी डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. लक्ष्मणच्या अचानक मृत्युमुळे शहरात खळबळ माजली असून त्याच्या पार्थिवावर रात्रीच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले.

### रेती वाहतुकीचा परवाना नसतांना

# अवैध रेती वाहतुक प्रकरणी दोघे अटकेत : ३२ लाखांचा मुददेमाल जप्त

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**वरुड** – कोणत्याही प्रकारचा रेती वाहतुकीचा परवाना नसतांना मध्यप्रदेशातून रेती चोरुन आणल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने दोघांना ताब्यात घेतले असून त्यांचेकडून एकूण ३२ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१२ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन शे.घाट हद्दीत विनापरवाना गौन खनिज रेती वाहतुकीवर कार्यवाही करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत खबर मिळाली की, ग्राम पुसला मार्गे शे.घाटकडे एक रेतीचा ट्रक येत आहे.

अशा माहितीवरुन पथकाने पोलीस स्टेशन शे.घाट हद्दीतील सातनूर चौफुली येथे नाकाबंदी करीत असतांना समोरुन एक टाटा कंपनीचा ट्रक येतांना दिसला. त्यास थांबवुन चालकाचे नाव विचारले असता गंगाधर कृष्णाजी कवडेती (३८), रा.कुरळी व दुसऱ्याचे नांव राजेश अंतुस उईके (३२) रा.पुसला असे सांगीतले. सदर ट्रकची पाहणी केली असता ट्रक मध्ये अंदाजे ७ ब्रास पांढरी रेती आढळुन आली. सदर अवैध रेती वाहतुकीबाबत रॉयल्टी मागीतला असता नसल्याचे चालकाने सांगीतले. वरुन रेती मालाबाबत अधिक विचारपुस केली असता, ट्रक मालक दिपक काळे रा.पुसला यांचे सांगणेवरुन रेतीची चोरटी वाहतुक केल्याचे सांगीतले. वरुन आरोपीतांचे ताब्यातुन अंदाजे ७ ब्रास पांढरी रेती किंमत अंदाजे ५९ हजार ५०० रुपये व एक टाटा सिगना कंपनीचा ट्रक किंमत अंदाजे ३२ लाख रुपये असा एकुण ३२ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सदर मुद्देमाल व आरोपी पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन शे.घाट यांचे ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी गंगाधर कवडेती व राजेश उईके यांना अटक करण्यात आली असून ट्रक मालक दिपक काळे हा फरार असल्याचे कळते.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांचे नेतृत्वात पोलिस उपनिरिक्षक आकाश शिवणकर, अमंलदार रुपेश गावंडे, शांताराम सोनोने, विवेक घोरमाडे यांचे पथकाने केली.




